SPECTRUM AGROTECH

An ISO 9001-2008 Certified Company

# Revolutionary Biological Solutions for Agriculture

Boosting crop productivity by providing quality plant nutrients



# आमची ओळख

देशाची भूक भागवण्यासाठी देशामध्ये 'हरित क्रांती' झाली, ज्याने उत्पादनात नक्कीच मोठी वाढ झाली. पण आज आपण त्याचे दूरगामी आणि गंभीर परिणाम भोगत आहोत. रासायनिक खते आणि विषारी कीटकनाशक, बुरशीनाशक तसेच तणनाशकांच्या अतिवापराने आपल्या काळ्या आईचा (जमिनीचा) पोत बिघडला, गांडुळांसारखे शेतकरी मित्र नष्ट झाले आणि मानवी आरोग्यालाही मोठा धोका निर्माण झाला. त्यामुळेच आज प्रत्येकाला विषमुक्त आणि 'निरोगी अन्नाची' नितांत गरज आहे. याच गरजेतून आणि **माती जिवंत, तर शेती समृद्ध** या एका साध्या पण अत्यंत महत्त्वाच्या विचारातून **स्पेक्ट्रम ॲग्रोटेक** कंपनीची स्थापना करण्यात आली.




"या वाढत्या संकटावर मात करण्यासाठी आणि रासायनिक शेतीच्या दुष्टचक्रातून बाहेर पडण्यासाठी 'स्पेक्ट्रम ॲग्रोटेक' ने शाश्वत जैविक आणि सेंद्रिय पर्यायांचा भक्कम मार्ग निवडला आहे. आमचा ठाम विश्वास आहे की, निसर्गाने ओढवलेल्या या समस्येवर निसर्गातच सर्वोत्तम उपाय दडलेले आहेत. म्हणूनच, आम्ही अशी अत्याधुनिक जैविक आणि सेंद्रिय उत्पादने तयार करून शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यावर भर देत आहोत. स्पेक्ट्रम ॲग्रोटेकचा उद्देश केवळ व्यावसायिक प्रगतीपुरता मर्यादित नसून, संपूर्ण देशात 'बायोलॉजिकल इंडिया' (Biological India) या क्रांतीची मुळे रुजवणे हा आहे, परंतु हा व्यापक बदल घडवून आणण्यासाठी केवळ जैविक उत्पादने पुरवणे पुरेसे नाही, याची आम्हाला जाणीव आहे. म्हणूनच, प्रत्येक कृषी-उद्योजकाला आणि शेतकऱ्याला तांत्रिकदृष्ट्या सक्षम (Technically Sound) बनवणे, हे आमचे प्रमुख उद्दिष्ट्य आहे. जमिनीतील उपयुक्त सूक्ष्मजीवांचे संतुलन कसे राखावे, पिकांच्या वाढीच्या विविध टप्प्यांवर योग्य जैविक व्यवस्थापन कसे करावे, आणि आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा शास्त्रशुद्ध वापर कसा करावा, याचे सखोल व व्यावसायिक मार्गदर्शन आम्ही देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. जेव्हा आमचा शेतकरी बांधव केवळ सल्ल्यांवर अवलंबून न राहता, स्वतःच्या अद्ययावत ज्ञानाने शेतीचे अचूक नियोजन करेल, तेव्हाच भारतीय कृषी क्षेत्र खऱ्या अर्थाने स्वयंपूर्ण होईल आणि 'बायोलॉजिकल इंडिया'चे हे भव्य स्वप्न वास्तवात उतरेल."

# आमचा पाया

## मिशन

माती आणि पीक व्यवस्थापनासाठी नाविन्यपूर्ण उपाय पुरवून सेंद्रिय शेतीचा प्रचार करणे आणि कृषी क्षेत्रातील दीर्घकालीन समृद्धी तसेच पर्यावरणीय समतोल राखण्यासाठी शेतकऱ्याला तांत्रिकदृष्ट्या सक्षम  बनवणे.



## व्हिजन

**जैविक भारत** नाविन्यपूर्ण जैविक शेती पद्धतींचा अवलंब करून आणि प्रगत तंत्रज्ञानाद्वारे शेतकऱ्यांना सक्षम बनवून, कृषी क्षेत्रात भारताला जागतिक स्तरावर अग्रेसर म्हणून प्रस्थापित करणे."




## उद्देश

- शेतकरी सक्षमीकरण
- शाश्वत आणि पर्यावरणपूरक शेती
- गुणवत्ता, पारदर्शकता आणि विश्वास
- संशोधन आणि तंत्रज्ञान



## फॉस्टेक +




**प्रमाण :**

**फवारणीसाठी :** 2 ग्रॅम / लिटर पाण्यासाठी

**जमिनीतून :** ड्रिप / ड्रेंचिंग : 1 किलो / एकर

**उपलब्ध पॅकिंग :** 400 ग्रॅम, 1 किलो

**सक्रिय घटक :**

- पोटॅशिअम सॉल्ट ऑफ फॉस्फाईट 98%

चिलेशन व अँटीऑक्सिडेंट पध्दतीने बनविलेले मार्केटमधील एकमेव उत्पादन.

**कार्यपद्धती :**

**फॉस्टेक** + ची कार्यपद्धती ही इतर सामान्य बुरशीनाशकांपेक्षा वेगळी आणि दुहेरी (Dual Action) स्वरूपाची असते

- **थेट बुरशीनाशक क्रिया :** जेव्हा हे बुरशीच्या (विशेषतः Oomycetes वर्गातील) संपर्कात येते, तेव्हा ते बुरशीच्या पेशीभित्तिकेवर हल्ला करते आणि तिचे स्पोअर्स तयार करण्याची प्रक्रिया थांबवते.
- **नैसर्गिक प्रतिकारशक्ती वाढवणे :** हे रसायन झाडाच्या पेशींमध्ये शिरल्यावर झाडाची नैसर्गिक संरक्षण प्रणालीस चालना देते. यामुळे झाडामध्ये 'फायटोअलेक्सिन' (Phytoalexins) आणि इतर संरक्षक रसायने आणि अँटीबॉडीज यांची निर्मिती अतिशय वेगाने होते.

**फायदे :**

- ३ स्वरूपातील फॉस्फरसचा उत्तम स्त्रोत
- फॉस्टेक + मधील फॉस्फाइट हा पिकामधील रोग नियंत्रणास मदत करते.
- फॉस्टेक + मधील फॉस्फोनाईट हा पिकांची प्रतिकरशक्ती वाढविते.
- फॉस्टेक + मधील फॉस्फेट हा पिकास फॉस्फरस व पोटॅश या अन्नद्रव्यांची पूर्तता करते.
- पिकांची फुलधारणा तसेच फळधारणा वाढविते.
- बुरशीजन्य व जिवाणूजन्य दोन्ही रोगांवर नियंत्रण मिळविते.
- मर रोग, मुळकुज, मुळसड, डावनी, भुरी, करपा, फायटोप्थोरा, सरकोस्पोरा, अल्टरनारिया, पिथीयम, फ्यूझारियम, रायझोक्टोनिया, स्क्लेरोशियम तसेच जिवाणूजन्य करपा आणि इतर रोगांचे नियंत्रण करण्यास मदत करते.

## विरासन




**प्रमाण :**

**सर्व पिकांसाठी :** पिकाच्या कोणत्याही अवस्थेत

**फवारणीसाठी :** 2 ते 2.5 मिली / लिटर पाण्यासाठी

**उपलब्ध पॅकिंग :** 250, 500 मिली, 1 लिटर

**सक्रिय घटक :**

- चिटोसान 12%

अँटीऑक्सिडेंट पध्दतीने बनविलेले मार्केटमधील एकमेव उत्पादन.

**कार्यपद्धती :**

- चिटोसानच्या रेणूंवर धन-प्रभार असतो, तर बुरशी आणि जी अँटीऑक्सिडेंट पध्दतीने बनविलेले मार्केटमधील एकमेव उत्पादन.
- वाणूंच्या पेशींवर ऋण-प्रभार असतो. त्यामुळे कायटोसान हानिकारक सूक्ष्मजीवांच्या पेशींना चिकटते, त्यांची पेशीभित्तिकेतून आत शिरते आणि त्यांच्या पेशीतील घटक बाहेर पडून ते सूक्ष्मजीव नष्ट होतात. तसेच पानांवर आणि फळांवर फवारणी केल्यावर कायटोसानचा एक अतिशय पातळ आणि न दिसणारा थर (Film) तयार होतो. हा थर बुरशीच्या बीजाणूंना (Spores) पानांवर रुजण्यापासून थांबवतो.

**फायदे :**

- उत्तम बुरशीनाशक, जिवाणूनाशक आणि पिक वाढ संप्रेरक म्हणून कार्य करते.
- बुरशीजन्य व जिवाणूजन्य रोगांचे नियंत्रणासाठी उपयुक्त.
- वातावरणातील बदलांमुळे पिकाचे होणारे नुकसान कमी करते.
- बियाण्यांची उगवण आणि मुळांची वाढ होण्यास मदत करते.
- पिकाची फुलगळ तसेच फळगळ कमी होते.
- दुष्काळ, अति उष्णता, अति थंडी किंवा जमिनीतील क्षारांचे वाढलेले प्रमाण (Salinity Stress) अशा प्रतिकूल परिस्थितीतही पिकांना तग धरून ठेवण्याची क्षमता वाढविते.
- अन्नद्रव्यांचा अपटेक आणि वहन सुधारते.
- भुरी, डाऊनी मिल्ड्यू, मुळकूज आणि खोडकूज, करपा, फळकूज, जीवाणूजन्य रोग, विषाणूजन्य रोग नियंत्रणास मदत करते.

# अँटीव्हायरो




**प्रमाण :**

**सर्व पिकांसाठी :** पिकाच्या कोणत्याही अवस्थेत

**फवारणीसाठी :** 1.25 ते 2 मिली / लिटर पाण्यासाठी

**उपलब्ध पॅकिंग :** 250, 500 मिली, 1 लिटर

### सक्रिय घटक :

- विविध हर्बल एक्स्ट्रॅक्ट

**अँटीव्हायरो** हे एक आधुनिक अँटीऑक्सिडंट संशोधनाचा वापर करून नैसर्गिक व ऑरगॅनिक पद्धतीने तयार केलेले उत्पादन आहे. अँटी व्हायरो हे एक प्रभावशाली असे विषाणूनाशक आहे.

### कार्यपद्धती :

विषाणूंना थेट मारण्याऐवजी प्रामुख्याने 'प्रतिकारशक्ती वाढवणे' आणि 'प्रसार रोखणे' या तत्त्वावर काम करते.

- **Systemic Acquired Resistance (SAR):** हे उत्पादन वनस्पतीमध्ये गेल्यावर तिची नैसर्गिक रोगप्रतिकारक शक्ती सक्रिय करते. यामुळे वनस्पती स्वतःहून विषाणूविरुद्ध लढण्यासाठी अँटीबॉडीज तयार करते.
- **प्रसार रोखणे (Inhibition of Viral Replication):** हे घटक विषाणूच्या पुनरुत्पादनाच्या प्रक्रियेत अडथळा आणतात. यामुळे विषाणू एका पेशीतून दुसऱ्या पेशीत पसरू शकत नाही.

### फायदे :

- पिकांमधील लिफ कर्ल, मोजॅक, येलो मोजॅक, येलो वेन मोजॅक, बंची टॉप, रिंग स्पॉट, टॉस्पो तसेच इतर व्हायरस नियंत्रणास मदत करते.
- एका झाडापासून दुसऱ्या झाडाला विषाणूचा प्रसार होण्यापासून रोखते.
- पिकाची नैसर्गिक प्रतिकारशक्ती सुधारते, ज्यामुळे झाड स्वतःहून विषाणूशी लढू शकते.
- संसर्ग झालेल्या झाडावर येणारी नवीन पाने आणि फुटवा निरोगी व हिरवागार येतो.
- पाने निरोगी झाल्यामुळे पिकाची प्रकाश संश्लेषण प्रक्रिया सुधारते.
- विषाणूमुळे होणारी फुलांची आणि फळांची गळती थांबते.
- फळे वेडीवाकडी होण्याचे प्रमाण कमी होते
- झाडाच्या अंतर्गत प्रणालीमध्ये जाऊन दीर्घकाळ संरक्षण प्रदान करतात.

# सुपर 40




**प्रमाण :**

**फवारणीसाठी :** 2 ते 2.5 मिली / लिटर पाण्यासाठी

**जमिनीतून :** ड्रिप / ड्रेंचिंग : 1 लिटर / एकर

**उपलब्ध पॅकिंग :** 500 मिली, 1 लिटर

### सक्रिय घटक :

- पोटॅशिअम सॉल्ट ऑफ फॉस्फोनिक ॲसिड 40%

### फायदे :

- बुरशीजन्य व जिवाणूजन्य दोन्ही रोगांवर नियंत्रण मिळविते.
- डावनी, भुरी, सरकोस्पोरा, अल्टरनारिया, करपा, फायटोप्थोरा, पिथियम, बोट्रायटिस तसेच जिवाणूजन्य करपा आणि इतर रोगांचे नियंत्रण करण्यास मदत करते.
- पिकांची नैसर्गिक रोगप्रतिकारक शक्ती वाढवते.
- पिकांची फुलधारणा तसेच फळधारणा वाढविते.
- पिकावरील ताण दूर करण्यास मदत करते.
- बुरशी आणि जिवाणूविरुद्ध प्रतिकारक्षमता निर्माण होत नाही.
- सुपर ४० चा उपयोग रोगांचा प्रतिबंध आणि उपचार या दोन्हीसाठी केला जातो.
- सर्वोत्तम परिणामांसाठी यासोबत स्पर्शजन्य बुरशीनाशकांचा वापर करावा.
- बोर्डोमिश्रण तसेच नॉनचिलेटेड सूक्ष्म अन्नद्रव्ये व कॅल्शियम खतांसोबत एकत्रित वापरू नये.

# प्लॅटिनो +




**प्लॅटिनो** + हे ऑरगॅनिक फॉर्म्युलेशन तसेच अन्नद्रव्यांवर आधारित मल्टीपरपज बायो स्टिम्युलंट आहे.

**फायदे :**

- प्लॅटिनो + हे पिकांची सशक्त व जोमदार वाढ होण्यास मदत करते.
- प्लॅटिनो + हे पानांचा आकार वाढून पाने जाड होण्यास मदत करते.
- प्लॅटिनो + मुळे हे पानांची काळोखी वाढून प्रकाश संश्लेषण होण्यास मदत होते.
- प्लॅटिनो + हे पिकाला भरपूर फुटवे तसेच फुलधारणा होण्यास मदत होते.
- प्लॅटिनो + मुळे फुलगळ आणि फळगळ थांबून फळांची सेटिंग होण्यास मदत होते.
- प्लॅटिनो + मुळे फळांचा आकार, रंग व चव उत्तम होण्यासाठी मदत करते.
- प्लॅटिनो + मुळे फळांमधील गर वाढून वजन वाढण्यासाठी मदत होते.
- पिकाची जैविक व अजैविक ताणाविरुद्ध प्रतिकार शक्ती वाढविते.
- प्लॅटिनो प्लस मुळे झाडांची रोग व कीड विरुद्ध प्रतिकार क्षमता वाढविण्यास मदत करते.
- प्लॅटिनो प्लस हे द्राक्ष घडाचा लवचिकपणा वाढविण्यास मदत करते.
- जिए, बुरशीनाशक व कीटकनाशक बरोबर मिसळून वापरता येते.

**प्रमाण :**

**सर्व पिकांसाठी :** पिकाच्या कोणत्याही अवस्थेत
**फवारणीसाठी :** 1.5 ते 2 मिली / लिटर पाण्यासाठी

**उपलब्ध पॅकिंग :** 100, 250, 500 मिली, 1 लिटर

# एस-ब्लॉसम




**'एस-ब्लॉसम'** हे पिकांची फूलधारणा, फळधारणा आणि फळांची साईज वाढविण्यासाठी डिझाईन केलेले एक प्रभावी आणि चमत्कारिक बायोस्टिम्युलंट आहे.

**फायदे :**

- पानांमधील क्लोरोफिलचे (हरितद्रव्याचे) प्रमाण वाढवते. यामुळे पाने अधिक हिरवीगार आणि निरोगी राहतात.
- क्लोरोफिल वाढल्यामुळे वनस्पतींची प्रकाशसंश्लेषण) वेगाने होते.
- पिकांची जोमदार वाढ होऊन फूटव्यांची संख्या वाढविते.
- पिकांमधील संप्रेरकांना (Hormones) चालना देते त्यामुळे भरघोस फुलधारणा होण्यास मदत होते.
- वातावरणातील बदलांमुळे किंवा पोषणाच्या अभावामुळे होणारी फूलगळ थांबवण्यास मदत करते.
- फुलांचे फळांमध्ये रूपांतर होण्याची प्रक्रिया जलदरीत्या होते यामुळे एकसमान फळधारणा होते.
- पेशींचे विभाजन वाढवून हे फळांचा आकार आणि लांबी वाढवण्यास मदत करते.
- फळांमधील गर वाढल्यामुळे फळांचे एकूण वजन वाढते.
- फळांचा आकार, चव, चमक आणि गुणवत्ता सुधारते.
- फळांची टिकवण क्षमता वाढून उत्पादनात वाढ होते.
- अन्नद्रव्ये (N-P-K आणि सूक्ष्म अन्नद्रव्ये) पिकांना सहज शोषून घेण्यास व त्यांचे वहन होण्यास मदत करते.
- पिकांची रोग व किड या विरुद्ध प्रतिकारशक्ती वाढविते.
- जैविक व अजैविक ताणाविरुद्ध पिकाची प्रतिकारशक्ती वाढविते.

**प्रमाण :**

**फवारणीसाठी :** 0.5 मिली / लिटर

**उपलब्ध पॅकिंग :** 50, 100, 250, 500 मिली, 1 लिटर

# रिसायझर




**प्रमाण :**

**फवारणीसाठी :** १ ते २ मिली / लिटर

**वापरण्याची वेळ :** मण्यांचा आकार 3-4 मिमी असताना, मण्यांचा आकार 6-7 मिमी असताना

**उपलब्ध पॅकिंग :** 250, 500 मिली, 1 लिटर

**सक्रिय घटक :**

- सिपीपियू (फोरक्लोरफेनुरॉन) 0.1%

**रिसायझर** हे 'सायटोकायनिन' (Cytokinin) गटातील सिपीपियू ०.१% (फोरक्लोरफेनुरॉन) आधारित एक अत्यंत प्रभावी 'प्लांट ग्रोथ रेग्युलेटर' (PGR) आहे. हे प्रामुख्याने एक कृत्रिम संप्रेरक (Hormone) आहे.

**कार्यपद्धती :**

CPPU वनस्पतीमध्ये मुळांद्वारे किंवा पानांद्वारे शोषले जाते. याची प्रमुख कार्यपद्धती खालीलप्रमाणे आहे:

- **पेशी विभाजन (Cell Division) & पेशींचा विस्तार (Cell Elongation & Enlargement) :** रिसायझर हे पेशी विभाजनाला मदत करते, म्हणजे एका पेशीचे विभाजन होऊन नवीन पेशी तयार होण्याची प्रक्रिया यामुळे पेशींची संख्या वेगाने वाढते. पेशींची केवळ संख्याच वाढत नाही, तर हे रसायन पेशींचा आकार आणि लांबी वाढवण्यासाठी देखील उत्तेजन देते.

**फायदे :**

- पेशी विभाजन आणि पेशींची लांबी वाढविण्यासाठी मदत करते.
- फळांचा आकार आणि वजन लक्षणीयरीत्या वाढण्यास मदत होते.
- पानांमधील हरितद्रव्य (क्लोरोफिल) टिकवून ठेवते त्यामुळे पाने जास्त काळ हिरवेगार राहतात.
- फळांना एकसमान आकार, आकर्षक रंग आणि चकाकी मिळते.
- फळ आणि देठामधील जोड अधिक मजबूत झाल्याने अकाली फळगळती तसेच मणीगळ थांबते.
- फळांची टिकवण क्षमता (Shelf Life) वाढते, त्यामुळे साठवणूक आणि वाहतुकीदरम्यान फळे खराब होण्याचे प्रमाण कमी होते.

# ओव्हरी 80




**प्रमाण :**

**फवारणीसाठी :** 2 ग्रॅम / 200 लिटर पाण्यासाठी

**उपलब्ध पॅकिंग :** 2 ग्रॅम

**ओव्हरी 80** हे विविध पिकामध्ये गर्भधारणा होण्यासाठी मदत करते.

**कार्यपद्धती :**

- **ऑक्झिनचे वहन रोखणे :** झाडाच्या शेंड्यामध्ये नैसर्गिकरित्या 'ऑक्झिन' नावाचे संप्रेरक तयार होते जे झाडाची उंची वाढवते. त्या ऑक्झिनला झाडाच्या खालच्या भागात (मुळांकडे) जाण्यापासून रोखते.
- **शेंडा वाढ थांबवणे (Breaking Apical Dominance):** शेंड्याची अनियंत्रित वाढ थांबल्यामुळे, पानात तयार झालेले अन्न (कर्बोदके) शेंड्याकडे न जाता थेट नवीन कळ्या जिथे फुटणार आहेत, त्या पेऱ्यांमध्ये जमा होते.

**फायदे :**

- अनावश्यक शाकीय वाढीवर नियंत्रण मिळते.
- पिकामधील हार्मोन्सचे संतुलन राखण्यास मदत करते.
- द्राक्ष व इतर फळपिकांमध्ये गर्भधारणा होण्यासाठी मदत करते.
- डाळिंब पिकात मादी फुलांची संख्या वाढविण्यासाठी मदत करते.
- भाजीपाला पिकामध्ये लवकर फुलधारणा होण्यास मदत करते.
- प्रतिकूल हवामानात पिकाची जैविक व अजैविक ताणाविरुद्ध प्रतिकारशक्ती सुधारते.
- पिकाची रोगप्रतिकारक शक्ती वाढविते.

# सोनाका ॲक्टिव




**प्रमाण :**
**फवारणीसाठी :** 1 ते 2 मिली / लिटर

**उपलब्ध पॅकिंग :** 250, 500 मिली, 1 लिटर

**सोनाका ॲक्टिव** हे पेशी विभाजन करून पेशींची लांबी वाढविणाऱ्या हार्मोन्सचे मिश्रण असलेले अद्वितीय उत्पादन आहे.

### कार्यपद्धती :

- **पेशी विभाजन (Cell Division) & पेशींचा विस्तार (Cell Elongation & Enlargement) :**सोनाका ॲक्टिव हे पेशी विभाजनाला मदत करते, म्हणजे एका पेशीचे विभाजन होऊन नवीन पेशी तयार होण्याची प्रक्रिया यामुळे पेशींची संख्या वेगाने वाढते. पेशींची केवळ संख्याच वाढत नाही, तर हे रसायन पेशींचा आकार आणि लांबी वाढवण्यासाठी देखील उत्तेजन देते.

### फायदे :

- पेशी विभाजन आणि विस्तार होऊन फळांचा आकार व लांबी वाढविते.
- पानांमधील हरितद्रव्य वाढून पाने दीर्घकाळ हिरवीगार राहतात.
- एकसमान लांबीची फळे मिळतात आणि लहान-मोठी फळे राहत नाहीत.
- फळांचे देठ मजबूत होतात, ज्यामुळे वाऱ्याने किंवा इतर कारणांनी होणारी अकाली फळगळती टळते.
- फळांचा नैसर्गिक रंग अधिक गडद, स्पष्ट आणि चमकदार होतो.
- फळांची साल मजबूत झाल्यामुळे ते काढणीनंतर लवकर खराब होत नाहीत आणि जास्त काळ टिकतात.
- फळांमधील गर वाढल्यामुळे वजनात तसेच एकरी उत्पादनात मोठी वाढ होते.
- द्राक्ष व केळी पिकामधील लांब व्हरायटी साठी उपयुक्त,
- मिरची, भेंडी, काकडी, दोडका, कारले, भोपळा, गिलके या भाजीपाला पिकांसाठी उपयुक्त

# ॲक्टिव बेरी




**प्रमाण :**
**फवारणीसाठी :** 0.5 ते 1 मिली / लिटर

**उपलब्ध पॅकिंग :** 100, 250, 500 मिली, 1 लिटर

### सक्रिय घटक :

- होमोब्रासिनोलाईड 0.04% + व्हिटॅमिन्स + स्टिम्युलंट

होमोब्रासिनोलाइड हे एक अत्यंत प्रभावी आणि नैसर्गिक वनस्पती संप्रेरक (Plant Growth Regulator) आहे. हे '**ब्रासिनोस्टेरॉइड्स**' (Brassinosteroids) या गटात मोडते. हे पिकांच्या वाढीला चालना देणारे एक उत्तम **बायोस्टिम्युलंट (Biostimulant)** म्हणून काम करते.

### कार्यपद्धती :

- **पेशी विभाजन (Cell Division) & पेशींचा विस्तार (Cell Elongation & Enlargement) :** ॲक्टिव बेरी  हे पेशी विभाजनाला मदत करते, म्हणजे एका पेशीचे विभाजन होऊन नवीन पेशी तयार होण्याची प्रक्रिया यामुळे पेशींची संख्या वेगाने वाढते. पेशींची केवळ संख्याच वाढत नाही, तर हे रसायन पेशींचा आकार आणि लांबी वाढवण्यासाठी देखील उत्तेजन देते.

### फायदे :

- पानांमधील हरितद्रव्य वाढवून पिक हिरवेगार, निरोगी आणि टवटवीत राहते.
- पिकाची फुलधारणा तसेच फळधारणा सुधारते.
- पेशींचे विभाजन आणि लांबी वाढवून फळांचा आकार एकसमान होतो.
- फळांतील गर वाढवून फळांचे वजन वाढवण्यास मदत करते.
- फळांचा आकार, रंग, चव, चमक तसेच टिकवण क्षमता यात सुधारणा होते.
- वातावरणातील अचानक बदल किंवा पोषणाच्या अभावामुळे अकाली होणारी फूल आणि फळगळती थांबविते.
- दुष्काळ, पाण्याची कमतरता, अति उष्णता किंवा अति थंडी अशा कठीण अजैविक परिस्थितीतही पिकांची प्रतिकारशक्ती वाढविते.
- पिकांमध्ये बिया तसेच फळांमध्ये दाणे पूर्णपणे आणि घट्ट भरायला मदत करते.
- पिकाची रोग व किड याविरुद्ध नैसर्गिक प्रतिकारशक्ती सुधारते.

## ॲमेझर +




**प्रमाण :**

**फवारणीसाठी :** 1.5 ते 2 मिली / लिटर

**उपलब्ध पॅकिंग :** 500 मिली, 1 लिटर

**सक्रिय घटक :**

- जिब्रेलिक ॲसिड 0.001%

**ॲमेझर +** हे एक अत्यंत प्रभावी प्लांट ग्रोथ रेगुलेटर आहे. हे एक नैसर्गिक संप्रेरक (Hormone) असून, पिकांची वाढ, फळांचा आकार आणि गुणवत्ता सुधारण्यासाठी मदत करते.

**फायदे :**

- बियाण्यांची सुप्तावस्था (Dormancy) मोडून त्यांची लवकर, एकसमान आणि जोमदार उगवण होण्यास हे मदत करते.
- वनस्पतीच्या पेशींचे विभाजन आणि विस्तार (Cell elongation) अत्यंत वेगाने करून संपूर्ण झाडाचा विकास गतीमान करते.
- पानांमधील हरितद्रव्य टिकवून ठेवते त्यामुळे पिके जास्त काळ हिरवीगार आणि निरोगी राहतात.
- पिकांमध्ये फांद्यांची संख्या, पानांची रुंदी आणि पिकाची उंची वाढवून पिकाचा जोमदार विकास करते.
- वेळेवर आणि एकसमान फुले येण्यास चालना देते.
- फुले आणि लहान फळांची गळती लक्षणीयरीत्या कमी करते,
- फळांचा आकार (Size), लांबी आणि वजन वाढवण्यासाठी हे अत्यंत फायदेशीर आहे.
- फळांना एकसमान रंग आणि चांगली चकाकी येते.
- गुलाब, झेंडू, जरबेरा यांसारख्या फुलशेतीमध्ये फुलांची दांडी लांब, मजबूत आणि आकर्षक करण्यासाठी हे अत्यंत फायदेशीर आहे.
- द्राक्षे आणि लिंबूवर्गीय फळांमध्ये 'बीजविरहित' (Seedless) फळे तयार होण्याच्या प्रक्रियेत हे अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावते.

## ओनियन सिक्रेट




**प्रमाण :**

**फवारणीसाठी :** 2 ते 2.5 मिली / लिटर

**उपलब्ध पॅकिंग :** 250, 500 मिली, 1 लिटर

**ओनियन सिक्रेट** हे कांदा पिकासाठी बनविलेले उच्च दर्जाचे बायोस्टीमूलंट आहे, याचा वापर कांदा पिकाच्या विविध अवस्थेत केला जातो.

**फायदे :**

- कांद्याच्या पातीची (पानांची) लांबी, रुंदी आणि संख्या वाढते.
- पानांमधील क्लोरोफिल (हरितद्रव्य) वाढल्यामुळे प्रकाशसंश्लेषण क्रिया वेगाने होते.
- तणनाशक फवारल्यानंतर कांद्याला बसणारा पिवळेपणाचा झटका कमी करते.
- कांदा पिकाची मांड तयार होण्यास मदत करते.
- पानांमध्ये तयार झालेले सर्व अन्नद्रव्य कांद्याकडे (बुंध्याकडे) वळविते.
- कांद्यांचा आकार लहान-मोठा न राहता, एकसारखा आणि गोलाकार होण्यास मदत होते.
- कांद्याला गडद लाल/गुलाबी रंग आणि आकर्षक चकाकी मिळते.
- कांद्याचे बाह्य आवरण मजबूत होते, ज्यामुळे काढणीनंतर कांदा सडत नाही आणि त्याची साठवणूक क्षमता वाढते.
- कांद्याचा तिखटपणा आणि चव सुधारते.

## ग्रो एक्सएल




**प्रमाण :**

**फवारणीसाठी :** 1.5 ते 2 मिली / लिटर पाण्यासाठी

**उपलब्ध पॅकिंग :** 250, 500 मिली, 1 लिटर

**ग्रो एक्सएल** हे ॲमिनो ॲसिड आणि इतर घटकांवर वर आधारित उच्च दर्जाचे पिक वाढ उत्तेजक (बायोस्टीमूलंट) आहे.

**फायदे :**

- वनस्पतींमध्ये प्रथिनांची निर्मिती अत्यंत वेगाने करून पिकांची वाढ जोमाने करणे.
- पानांमधील हरितद्रव्याचे प्रमाण वाढते, यामुळे पाने अधिक हिरवीगार होतात.
- पिकांच्या वाढीसाठी आवश्यक असणारे नैसर्गिक हार्मोन्स तयार करण्यास मदत करते.
- भरघोस फूलधारणा आणि फळधारणा होण्यास मदत करते.
- फुलगळ आणि फळगळ थांबविते.
- पिकांची नैसर्गिक रोगप्रतिकारक शक्ती वाढते.
- द्राक्ष घडाच्या पाकळ्यांची लांबी वाढविते.
- पिकांची अन्नद्रव्ये शोषून घेण्याची क्षमता वाढविते.
- फळांचा आकार, रंग, चव, चमक तसेच टिकवण क्षमता यात सुधारणा होते.

## ग्रीन गोल्ड




**प्रमाण :**

**फवारणीसाठी :** 2 ते 2.5 मिली / लिटर

**उपलब्ध पॅकिंग :** 500 मिली, 1 लिटर

**ग्रीन गोल्ड** हे २५ ॲमिनो ॲसिड, सिविड एक्स्ट्रॅक्ट, ह्युमिक ॲसिड, फुलविक ॲसिड, ऑरगॅनिक न्यूट्रियंट्स व ट्रेस एलिमेंट यांचे मिश्रण आहे.

**फायदे :**

- पानांमधील क्लोरोफिल वाढून पाने हिरवीगार व टवटवीत होतात.
- पिकांची फुलधारणा वाढविण्यास मदत करते.
- पिकांची फुलगळ आणि फळगळ कमी करण्यास मदत करते.
- पिकाची सेटिंग म्हणजेच फुलांचे फळात रूपांतर होण्यास मदत करते.
- फळांचा आकार, रंग, चव, चमक तसेच टिकवण क्षमता वाढविते,
- जैविक व अजैविक ताणाविरुद्ध पिकांची प्रतिकारशक्ती वाढविते.
- पिकांची नैसर्गिक प्रतिकारशक्ती सुधारते.

## क्विक शुगर




**प्रमाण :**

**फवारणीसाठी :** 2 ते 2.5 मिली / लिटर

**उपलब्ध पॅकिंग :** 500 मिली, 1 लिटर

**क्विक शुगर** हे एक विशेष प्रकारचे बायो-स्टिम्युलंट आहे, जे फळांमधील नैसर्गिक साखरेचे म्हणजेच 'फ्रुक्टोज'चे (Fructose) प्रमाण आणि 'ब्रिक्स पातळी' (Brix Level) वाढवण्यासाठी मदत करते.

**फायदे :**

- फळांमधील शुगर म्हणजेच गोडी (Brix Level) वाढविते.
- फळांमधील गर वाढून फळांचे वजन वाढण्यास मदत करते.
- फळांचा आकार, रंग, चव, चमक तसेच गुणवत्ता सुधारण्यास मदत करते.
- फळे तडकण्याचे प्रमाण कमी करते.
- फळे एकाच वेळी आणि एकसमान पिकण्यास मदत होते.
- पिकांची नैसर्गिक रोगप्रतिकारक शक्ती वाढते

# सॉइल रिच

**सॉइल रिच** हे सिविड एक्सट्रॅक्ट, ह्युमिक ॲसिड, फुल्वीक ॲसिड, अमिनो ॲसिड, मायक्रोन्यूट्रियंट , एन्झाइम्स, प्लँट हार्मोन्स यावर आधारित उच्च दर्जाचे उत्पादन आहे.

**फायदे :**

- पांढऱ्या मुळांची वाढ आणि विस्तार होण्यास मदत करते.
- जमिनीचा पोत सुधारून ती अधिक भुसभुशीत होते.
- जमिनीची पाणी धरून ठेवण्याची क्षमता वाढविते.
- जमिनीतील अन्नद्रव्ये शोषून घेण्याची मुळांची क्षमता वाढते.
- पिकांमध्ये भरघोस फूलधारणा आणि फळधारणा होण्यास मदत होते.
- फुलांची आणि लहान फळांची होणारी गळती थांबते.
- फळांचा आकार, फुगवण आणि वजन वाढण्यास मदत होते.
- पिकांची नैसर्गिक रोगप्रतिकारक शक्ती सुधारते.
- अतिउष्णता किंवा थंडीसारख्या हवामानाचा पिकांवरील ताण कमी होतो.
- जमिनीतील उपयुक्त आणि मित्र जिवाणूंची संख्या वाढते.
- पिकाच्या दर्जात सुधारणा होऊन एकूण उत्पादनात भरघोस वाढ होते.




**प्रमाण :**

**जमिनीतून ड्रिप / ड्रेंचिंग द्वारे:** 1 लिटर / एकर

**उपलब्ध पॅकिंग :** 500 मिली, 1 लिटर

# स्पेक ह्युमिक

**स्पेक ह्युमिक** हे ह्युमिक ॲसिड आणि सेंद्रिय कर्ब वर आधारित उत्पादन आहे, जे मातीचा पोत सुधारून पिकाचे उत्पादन वाढवण्यास मदत करते.

**फायदे :**

- पिकांच्या पांढऱ्या मुळांची जलद आणि निरोगी वाढ करते.
- जमीन भुसभुशीत करते त्यामुळे जमिनीत हवा खेळती राहण्यास मदत होते.
- जमिनीत सेंद्रिय कर्बाचे प्रमाण वाढवते.
- जमिनीची पाणी धरून ठेवण्याची क्षमता वाढवते.
- रासायनिक खते आणि जमिनीतील इतर अन्नद्रव्ये पिकांना सहज उपलब्ध करून देण्याचे काम करते.
- मातीतील उपयुक्त सूक्ष्म जिवाणूंची संख्या आणि कार्यक्षमता वाढवते.
- खते वाहून जाण्यापासून रोखते, ज्यामुळे खतांची कार्यक्षमता वाढते आणि खर्चात बचत होते.
- जमिनीत फिक्स झालेली खते उपलब्ध होण्यास मदत होते.
- जमिनीतील अतिरिक्त क्षारांचे दुष्परिणाम कमी करून मुळांना सुरक्षित ठेवते.




**प्रमाण :**

**जमिनीतून ड्रिप / ड्रेंचिंग द्वारे :** 500 ग्रॅम ते 1 किलो / एकर

**उपलब्ध पॅकिंग :** 500 ग्रॅम , 1 किलो

# स्पेकसिल

**सक्रिय घटक :**

- सिलिकॉन 98%

**स्पेकसिल** हे सिलिकॉन वर आधारित पावडर स्वरूपातील उच्च दर्जाचे उत्पादन आहे.

**फायदे :**

- स्पेकसिलच्या वापरामुळे पाने ताठ आणि रुंद राहतात.
- पानांतील हरितद्रव्याचे प्रमाण वाढून पाने हिरवीगार होतात.
- फळांचा आकार, रंग, चमक, चव तसेच टिकवण क्षमता यात सुधारणा करते.
- पानांवर सिलिकॉनचा कडक थर तयार झाल्यामुळे बुरशी तसेच इतर किडीपासून संरक्षण मिळते.
- पाण्याचा ताण सहन करण्याची क्षमता वाढविते.
- जमिनीतून दिलेली रासायनिक खते पिकांना सहज उपलब्ध करून देण्यास मदत करते.
- विषारी घटकांचा प्रभाव कमी करण्यास मदत करते.
- क्षारयुक्त जमिनीत देखील पिकांची वाढ होण्यास मदत करते.
- अति ऊन तसेच अति थंडी किंवा इतर अजैविक ताणापासून पिकाचे संरक्षण करते.




**प्रमाण :**

**फवारणीसाठी :** 2 ते 2.5 ग्रॅम / लिटर

**जमिनीतून : ड्रिप / ड्रेंचिंग :** 1 किलो / एकर

**उपलब्ध पॅकिंग :** 500 ग्रॅम , 1 किलो

# अँझागार्ड




**प्रमाण :**

**फवारणीसाठी :** 1 ते 2 मिली / लिटर

**उपलब्ध पॅकिंग :** 250, 500 मिली, 1 लिटर

# बिटर




**प्रमाण :**

**फवारणीसाठी :** 0.5 ते 1 मिली / लिटर

**उपलब्ध पॅकिंग :** 100, 250, 500 मिली, 1 लिटर

## सक्रिय घटक :

- **अँझागार्ड :** अँझाडिरॅक्टीन 10000 पीपीएम
- **बिटर :** अँझाडिरॅक्टीन 125000 पीपीएम

**अँझागार्ड** आणि **बिटर** हे कडुलिंब म्हणजेच निम अर्कावर आधारित अत्यंत प्रभावी हर्बल किटकनाशक आहे.

## कार्यपद्धती :

- **अन्न खाण्यास मज्जाव (Antifeedant Effect):** जेव्हा फवारणी केलेली पाने कीटक खातात, तेव्हा हे रसायन कीटकांची भूक मारते. कीटकांना ते पान कडू आणि न खाण्यायोग्य वाटते, ज्यामुळे ते खाणे थांबवतात आणि शेवटी उपाशी राहून मरतात.
- **वाढीवर नियंत्रण (Insect Growth Regulator - IGR):** कीटकांच्या वाढीसाठी आणि त्यांना कात टाकण्यासाठी (Molting) 'एक्डायसोन' (Ecdysone) नावाचे संप्रेरक आवश्यक असते. यामुळे संप्रेरकाची निर्मिती रोखते. परिणामी, अळीचे कोषात किंवा कोषाचे पतंगात रूपांतर होऊ शकत नाही आणि कीटक मधेच मरतो.
- **अंडी घालण्यास प्रतिबंध (Oviposition Deterrent):** उग्र वास आणि चव यामुळे मादी कीटक पिकांच्या पानांवर अंडी घालणे टाळतात.
- **प्रजनन क्षमतेवर परिणाम (Sterilant Effect):** हे कीटकांची प्रजनन क्षमता (Fertility) कमी करते. मादी कीटकांची अंडी देण्याची क्षमता कमी होते आणि जर अंडी घातलीच, तर त्यातून पिल्ले बाहेर येण्याचे प्रमाण खूप कमी असते.
- प्रतिबंधक : या उत्पादनांमध्ये एक विशिष्ट उग्र आणि कडू वास असतो. कीटक त्यांच्या वासाच्या संवेदनांद्वारे अन्न शोधतात. जेव्हा पिकांवर याची फवारणी केली जाते, तेव्हा या वासाच्या तीव्रतेमुळे कीटक पिकांकडे आकर्षित होत नाहीत आणि फवारणी केलेल्या क्षेत्रापासून दूर उडून जातात.

## फायदे :

ही उत्पादने साधारणपणे २०० पेक्षा जास्त प्रकारच्या किडींवर प्रभावी आहेत. यामध्ये प्रामुख्याने खालील किडींचा समावेश होतो:

- **रस शोषणारी कीड (Sucking Pests) :** पांढरी माशी (Whitefly), मावा (Aphids), तुडतुडे (Jassids/Leafhoppers), फुलकिडे (Thrips) आणि पिठ्या ढेकूण (Mealybugs).
- **पाने खाणाऱ्या अळ्या (Caterpillars) :** लष्करी अळी (Armyworm), फळ पोखरणारी अळी (Fruit borer), शेंडे पोखरणारी अळी (Shoot borer), आणि पाने गुंडाळणारी अळी (Leaf folder).
- **मातीतील कीड:** वाळवी (Termites) आणि सूत्रकृमी (Nematodes) यांचे प्रभावी नियंत्रण होते.
- कीटकनाशक असण्यासोबतच काही प्रमाणात अँटी-फंगल आणि अँटी-बॅक्टेरियल गुणधर्म आहेत त्यामुळे पिकांवरील बुरशीजन्य आणि जिवाणूजन्य रोगांना आळा घालण्यास मदत करतात.
- किडींमध्ये कोणत्याही प्रकारची प्रतिकारशक्ती वाढत नाही.
- फवारणीनंतर पिकांवर, फळांवर किंवा पालेभाज्यांवर मानवी आरोग्याला घातक असा कोणताही विषारी अंश (Residue) राहत नाही.
- मित्र किडीसाठी सुरक्षित व प्रभावी
- सेंद्रिय शेतीसाठी सर्वोत्तम पर्याय

## मिनस 4 I




**प्रमाण :**

**फवारणी साठी :** 1.25 ते 1.5 मिली / लिटर

**उपलब्ध पॅकिंग : 100, 250, 500 मिली, 1 लिटर**

### सक्रिय घटक :

- विविध हर्बल एक्स्ट्रॅक्ट

**मिनस 4 I** हे ' एक प्रभावी **हर्बल (Botanical Extract)** कीटकनाशक आहे. हे विशेषतः पिकांवरील रसशोषक कीटकांना नियंत्रित करते तसेच हे परागीभवनासाठी मधमाश्यांना आकर्षित करण्यास मदत करते.

### कार्यपद्धती :

- **खाण्यापासून प्रतिबंध (Antifeedant):** पानांच्या कडू चवीमुळे कीटक खाणे थांबवतात आणि अन्नावाचून मरतात.
- **वाढ रोखणे (IGR):** कीटकांच्या शरीरातील 'एक्डायसोन' संप्रेरकात अडथळा आणून त्यांची वाढ थांबवते.
- **अंडी घालण्यास मज्जाव:** उग्र वासामुळे मादी कीटक पिकावर अंडी घालत नाहीत.
- **प्रजनन क्षमता कमी करणे:** कीटकांची पुनरुत्पादन शक्ती कमकुवत होते, ज्यामुळे पुढील पिढी तयार होत नाही.
- **आकर्षण :** याच्या विशिष्ट वासामुळे मधमाशी फुलांकडे मोठ्या प्रमाणात आकर्षित होतात.

### फायदे :

- मावा, पांढरी माशी, थ्रिप्स, तुडतुडे तसेच इतर रसशोषक किड नियंत्रणासाठी मदत करते.
- लाल कोळी तसेच इतर कोळीवर्गीय किड नियंत्रणासाठी मदत करते.
- किडींमध्ये कोणत्याही प्रकारची प्रतिकारशक्ती वाढत नाही.
- मित्र किडीसाठी सुरक्षित व प्रभावी
- सेंद्रिय शेतीसाठी सर्वोत्तम पर्याय
- 100% रेसिडयू फ्री उत्पादन

## इकोकिल




**प्रमाण :**

**फवारणीसाठी:** 1.5 ते 2 मिली / लिटर

**उपलब्ध पॅकिंग :** 250, 500 मिली, 1 लिटर

### सक्रिय घटक :

- हर्बल एक्स्ट्रॅक्ट

**इकोकिल** हे हर्बल एक्स्ट्रॅक्ट पासून बनविलेले उच्च दर्जाचे एक अळीनाशक आहे.

### कार्यपद्धती :

- **खाण्यापासून प्रतिबंध (Antifeedant):** पानांच्या कडू चवीमुळे कीटक खाणे थांबवतात आणि अन्नावाचून मरतात.
- **वाढ रोखणे (IGR):** कीटकांच्या शरीरातील 'एक्डायसोन' संप्रेरकात अडथळा आणून त्यांची वाढ थांबवते.
- **अंडी घालण्यास मज्जाव:** उग्र वासामुळे मादी कीटक पिकावर अंडी घालत नाहीत.

### फायदे :

- पिकांचे नुकसान करणाऱ्या प्रमुख लष्करी अळी, घाटेअळी, बोंडअळी, शेंडा व फळ पोखरणारी अळी, पाने गुंडाळणारी अळी, नागअळी, चौकोनी ठिपक्यांच्या पतंगाची अळी, कटवर्म, उंटअळी, केसाळ अळी आणि तंबाखूवरील पाने खाणारी अळी या अळीचे नियंत्रण करते.
- अळ्यांसोबतच रसशोषक किड जसे की मावा, पांढरी माशी, थ्रिप्स आणि इतर किडीचे नियंत्रण करण्यास मदत करते.
- कीटकांमध्ये याविरुद्ध प्रतिकारशक्ती निर्माण होत नाही.
- फवारणीनंतर पिकांवर, फळांवर किंवा पालेभाज्यांवर मानवी आरोग्याला घातक असा कोणताही विषारी अंश (Residue) राहत नाही.
- अळ्यांसोबतच हे काही प्रकारच्या बुरशीजन्य रोगांनाही रोखते.

## लार्वा सॉइल




**प्रमाण :**

**जमिनीतून : ड्रिप / ड्रेंचिंगद्वारे :** 2 मिली / झाड किंवा 1 लिटर / एकर

**उपलब्ध पॅकिंग :** 500 मिली, 1 लिटर

### सक्रिय घटक :

- विविध हर्बल एक्स्ट्रॅक्ट

**लार्वा सॉइल** हे आधुनिक तंत्रज्ञानाने तयार केलेले एक शक्तिशाली वनस्पतीजन्य कीटकनाशक आहे.. हे उत्पादन विशेषतः खोडकीड (Stem Borer), शेंडा पोखरणारी अळी आणि फळ पोखरणाऱ्या अळ्यांच्या प्रभावी नियंत्रणासाठी तयार केलेले आहे.

### कार्यपद्धती :

- **जमिनीतून : आंतरप्रवाही (सिस्टिमिक ॲक्शन) :** काही वनस्पतीजन्य अर्कमुळांद्वारे शोषले जातात आणि झाडाच्या संपूर्ण रसामध्ये पसरतात. जेव्हा खोडकीड खोड कुरतडते, तेव्हा हा विषारी रस तिच्या पोटात जातो. हा अर्क तिच्या पचनसंस्थेत जाऊन तिला अर्धांगवायू करतो, ज्यामुळे ती अन्न खाणे बंद करते आणि काही दिवसांत तिचा मृत्यू होतो. तसेच अर्क किडीच्या संप्रेरकांमध्ये (Hormones) अडथळा आणतात, ज्यामुळे अळीची कात टाकण्याची प्रक्रिया थांबते आणि तिचे रूपांतर कोशात किंवा पतंगात होऊ शकत नाही.

### फायदे :

- लार्वा सॉइल हे द्राक्ष, डाळिंब, केळी, उस, आंबा, लिंबूवर्गीय पिके तसेच इतर फळपिकांमध्ये खोडकिडीच्या नियंत्रणासाठी उपयुक्त आहे.
- एकाच वेळी अंडी, अळी आणि प्रौढ अशा सर्व अवस्थांवर नियंत्रणासाठी उपयुक्त.
- ड्रेंचिंगमुळे मातीतील उपयुक्त जिवाणूंना इजा होत नाही, उलट मातीचा पोत सुधारण्यास मदत होते.
- किडींमध्ये कोणत्याही प्रकारची प्रतिकारशक्ती वाढत नाही.
- फवारणीनंतर पिकांवर, फळांवर किंवा पालेभाज्यांवर मानवी आरोग्याला घातक असा कोणताही विषारी अंश (Residue) राहत नाही.

## मिल आउट




**प्रमाण :**

**फवारणीसाठी :** 2 मिली / लिटर

**उपलब्ध पॅकिंग :** 250, 500 मिली, 1 लिटर

**मिल आउट** हे फिश ऑइल आणि इतर हर्बल एक्स्ट्रॅक्ट वर आधारित कृषी क्षेत्रातील एक अत्यंत प्रभावी आणि पर्यावरणपूरक कीटकनाशक म्हणून ओळखले जाते. विशेषतः पिठ्या ढेकुण (Mealybug) आणि इतर रसशोषक किडींच्या नियंत्रणासाठी हे रामबाण उपाय मानले जाते.

### कार्यपद्धती :

हे प्रामुख्याने 'स्पर्शजन्य' पद्धतीने काम करते. याचे कार्य खालीलप्रमाणे चालते:

- **श्वसनात अडथळा :** किडींच्या शरीरावर तयार होतो. यामुळे त्यांच्या शरीरावरील श्वासोच्छवासाची छिद्रे (Spiracles) बंद होतात आणि गुदमरून कीड मरते.
- **संरक्षक कवच नष्ट करणे :** रसशोषक किडींच्या (उदा. मावा, तुडतुडे, मिलीबग) शरीरावर मेणासारखा संरक्षक थर असतो. मिल आउट हा थर विरघळवून टाकते, ज्यामुळे किडींच्या शरीरातील पेशींमधून पाणी बाहेर पडते आणि शरीरामध्ये पाण्याची कमतरता होऊन किड मरते.
- **अंडीनाशक :** हे किडींच्या अंड्यांच्या आवरणात शिरून त्यांना नष्ट करते, ज्यामुळे किडींची पुढची पिढी तयार होण्यास प्रतिबंध होतो.

### फायदे :

- पिठ्या ढेकुण (Mealybug) साठी हे सर्वोत्तम नैसर्गिक औषध आहे.
- पांढरी माशी, थ्रिप्स, मावा आणि तुडतुडे यांसारख्या सर्व रसशोषक किडींवर प्रभावी.
- द्राक्षे किंवा इतर फळांवरील मधासारखा चिकट थर साफ करण्यास मदत करते.
- उत्कृष्ट स्टिकर आणि स्प्रेडर म्हणून कार्य करते.
- बुरशीनाशक तसेच किटकनाशक सोबत मिसळून वापरता येते.
- 100% रेसिडयू फ्री उत्पादन

## अ‍ॅक्वा ट्रीट




**प्रमाण :**
**फवारणीसाठी:** 0.5 मिली / लिटर

**उपलब्ध पॅकिंग :** 100, 250, 500 मिली, 1 लिटर

**अ‍ॅक्वा ट्रीट** हे फवारणीच्या पाण्याचा pH नियंत्रित करण्यास मदत करते.

**फायदे :**

- कीटकनाशके आणि बुरशीनाशके यांची कार्यक्षमता वाढविते.
- कमी किंवा जास्त pH मुळे औषध फुटण्यापासून वाचवते.
- पाने औषध लवकर शोषून घेतात.
- विद्राव्य खतांचे शोषण (Nutrient Uptake) वाढते.
- चुकीच्या pH मुळे पानांवर येणारे स्कॉर्चिंग (करपा) थांबते.
- दोन-तीन औषधे एकत्र मिसळताना होणारी रिॲक्शन टाळते.
- फवारणीनंतर कीड आणि रोगांचे नियंत्रण जास्त दिवस राहते.

## अलायंस pH




**प्रमाण :**
**फवारणीसाठी :** 3 ते 4 मिली / लिटर डीपिंग पाण्यासाठी

**उपलब्ध पॅकिंग :** 1, 5 लिटर

**अलायंस pH** हे नाविन्यपूर्ण संशोधन करून द्राक्ष डीपिंगमध्ये GA ची कार्यक्षमता वाढविण्यासाठी बनविलेले pH बॅलेन्सर आहे.

**फायदे :**

- जीए चे चांगले रिझल्ट मिळण्यासाठी पाण्याचा pH 5.5 ते 6.5 दरम्यान स्थिर ठेवते.
- फवारणीसाठी दीर्घकाळ पाण्याचा pH स्थिर ठेवते.
- जीए १००% कार्यक्षमता वाढविते.
- डीपिंगमधील संजीवकांच्या द्रावणाची कार्यक्षमता वाढविते.
- डीपिंगमध्ये जिबरेलिन, संजीवके, बुरशीनाशके, किटकनाशके यासोबत मिसळून वापरता येते.

## फ्युजन




**प्रमाण :**
**फवारणीसाठी:** 0.25 ते 0.5 मिली / लिटर

**उपलब्ध पॅकिंग :** 100, 250, 500 मिली

**फ्युजन** हे सिलिकॉन वर आधारित नॉन आयोनिक स्प्रे ॲडजूवंट आहे. फ्युजन हे **स्टिकर, स्प्रेडर, पेनिट्रेटर** आणि **ॲक्टिव्हेटर** म्हणून उत्कृष्ट काम करते.

**फायदे :**

- फवारणीचे द्रावण पानाच्या पृष्ठभागावर एकसारखे पसरवते.
- फवारणीनंतर अचानक पाऊस आल्यास पानांच्या पृष्ठभागावर घट्ट चिकटून राहण्यास मदत करते.
- फवारणीचे द्रावण एकसारखे पसरत असल्याने फवारणीसाठी लागणारे पाण्याचे आणि औषधाचे प्रमाण कमी लागते.
- फवारणीच्या द्रावणाचे पानांमध्ये त्वरित शोषण होण्यास मदत करते.
- फवारणीच्या द्रावणाची कार्यक्षमता वाढविते.
- बुरशीनाशके, किटकनाशके, तणनाशके तसेच संजीवकांसोबत मिसळून वापरता येते.

## कॅलट्रिक्स




**प्रमाण :**
**फवारणीसाठी :** 1.5 ते 2 मिली / लिटर
**जमिनीतून : ड्रिप / ड्रेंचिंगद्वारे :** 1 लिटर / एकर

**उपलब्ध पॅकिंग :** 250, 500 मिली, 1 लिटर

**सक्रिय घटक :**

- कॉन्सन्ट्रेटेड कॅल्शियम लिक्विड ११%

**कॅलट्रिक्स** हे कॉन्सन्ट्रेटेड कॅल्शियम लिक्विड ११% वर आधारित द्रव स्वरूपातील खत आहे द्रव स्वरूपात असल्यामुळे ते पानांद्वारे आणि मुळांद्वारे पिकांकडून अत्यंत वेगाने आणि सहजरीत्या शोषले जाते.

**फायदे :**

- मुळांच्या टोकाची वाढ जलद करून पांढऱ्या मुळीचे जाळे वाढवते.
- पिकाची फुलधारणा आणि फळधारणा सुधारते.
- वातावरणातील बदलांमुळे होणारी फूलगळ आणि फळगळ थांबवते.
- फुलांमधील परागकणांची वाढ चांगली करून फळधारणा वाढवते.
- फळांचा आकार, चव, चमक तसेच गुणवत्तेत सुधारणा होते.
- फळांमधील विकृती जसे की टोमॅटो ब्लॉसम एंड रॉट, सफरचंद आणि इतर फळबागांमध्ये फळांवरील काळे डाग तसेच फळे तडकण्याचे प्रमाण कमी होते.
- द्रव स्वरूपात असल्यामुळे पिकांकडून तत्काळ शोषले जाते आणि लवकर रिझल्ट देते.

## सिएमबी मॅक्स




**प्रमाण :**
**फवारणीसाठी :** 2 ते 3 मिली / लिटर पाण्यासाठी
**जमिनीतून :** ड्रिप / ड्रेंचिंग द्वारे : 1.5 ते 2 लिटर / एकर

**उपलब्ध पॅकिंग :** 250, 500 मिली, 1 लिटर

**सिएमबी मॅक्स** हे पिकांच्या निरोगी आणि जोमदार वाढीसाठी कॅल्शियम (Ca), मॅग्नेशियम (Mg) आणि बोरॉन (B) या अत्यंत महत्त्वाच्या दुय्यम आणि सूक्ष्म अन्नद्रव्यांवर आधारित उत्पादन आहे.

**फायदे :**

- पिकांच्या शेंड्याची निरोगी वाढ होते तसेच नवीन पानांची विकृती आणि वेडेवाकडेपणा टळतो.
- पानांमधील हरितद्रव्याचे प्रमाण वाढते त्यामुळे पाने हिरवीगार व निरोगी होतात.
- पिकाला भरपूर प्रमाणात फुले लागण्यासाठी मदत करते.
- फुलांच्या देठांना मजबूती मिळाल्याने अकाली होणारी फुलगळ आणि कळीगळ पूर्णपणे थांबवते.
- परागकणांची निर्मिती वाढविते त्यामुळे परागीभवन अत्यंत प्रभावीपणे होते.
- फळांचा आकार, रंग, चव तसेच चमक यात सुधारणा होते.
- फळांमधील विकृती, फळे तडकणे तसेच वाकडेपणा दूर होण्यास मदत होते.
- फळांमधील शुगर (ब्रिक्स लेवल) वाढून फळांचा गोडवा वाढविते.
- पिकाची नैसर्गिक रोगप्रतिकारक शक्ती वाढते.

## कॅलझिबोर




**प्रमाण :**
**फवारणीसाठी :** 1.5 ते 2 मिली / लिटर
**जमिनीतून : ड्रिप / ड्रेंचिंग द्वारे :** 1 लिटर / एकर

**उपलब्ध पॅकिंग :** 250, 500 मिली, 1 लिटर

**कॅलझिबोर** हे पिकांच्या सर्वांगीण वाढीसाठी कॅल्शियम (Calcium), झिंक (Zinc) आणि बोरॉन (Boron) या अन्नद्रव्यांच्या मिश्रणातून तयार केलेले उच्च दर्जाचे उत्पादन आहे.

**फायदे :**

- पिकामधील नैसर्गिक हार्मोन्सचे संतुलन राखण्यास मदत करते.
- पेशीभित्तिका जाड झाल्यामुळे कीड आणि रोगांचा प्रादुर्भाव कमी होतो.
- पिकांची फुलधारणा आणि फळधारणा सुधारण्यास मदत करते.
- अति उष्णता किंवा थंडी यांसारख्या प्रतिकूल हवामानात पिकाची प्रतिकारशक्ती वाढविते.
- फुले आणि लहान फळे गळण्याचे प्रमाण लक्षणीयरीत्या कमी होते.
- क्लोरोफिलचे प्रमाण वाढून पानांची काळोखी वाढविण्यास मदत करते.
- फळांचा आकार, रंग, चव व चमक यात सुधारणा होते.
- फळांमधील विकृती, फळे तडकणे तसेच वाकडेपणा दूर होण्यास मदत होते.
- फळांमधील साखरेचे प्रमाण (Brix level) वाढवून फळे गोड होतात.

# स्पेक्ट्रा झिंक




**Zinc Oxide 39.5%** **Zinc Gluconate 12%**

**प्रमाण :**

**फवारणीसाठी :** 1 ते 2 मिली / लिटर
**जमिनीतून :** ड्रिप / ड्रेंचिंग द्वारे : 500 मिली ते 1 लिटर / एकर

**उपलब्ध पॅकिंग :** 250, 500 मिली, 1 लिटर

**सक्रिय घटक :**

- ग्लुकोनेट झिंक 12% आणि झिंक ऑक्साइड 39.5%

**स्पेक्ट्रा झिंक** हे एक प्रगत तंत्रज्ञानाने ग्लुकोनेट आणि ऑक्साइड स्वरूपातील सूक्ष्म अन्नद्रव्य आहे, ग्लुकोनेट आणि ऑक्साइड फॉर्म्युलेशनमुळे झाडे हे झिंक अत्यंत वेगाने शोषून घेतात.

**फायदे :**

- ग्लुकोनेट आणि ऑक्साइड फॉर्म्युलेशनमुळे झिंक पिकांच्या पेशींमध्ये अत्यंत वेगाने शोषले जाते.
- पानांमध्ये हरितद्रव्य वाढवून प्रकाशसंश्लेषण प्रक्रिया सुधारते
- पांढऱ्या मुळांची संख्या वाढवण्यास मदत करते.
- ऑक्सिन' (Auxin) या वाढीच्या संप्रेरकाची निर्मिती करण्यास मदत होते.
- जास्तीत जास्त फुले व फळे लागण्यास मदत करते.
- पिकांची नैसर्गिक प्रतिकारशक्ती वाढवून विविध किड व रोगांपासून संरक्षण करते.
- पानांमधील पिवळेपणा किंवा शिरांमधील पिवळेपणा दूर करण्यास मदत करते.
- पाण्याचा ताण सहन करण्याची क्षमता वाढविते.
- सर्वच कीटकनाशके आणि बुरशीनाशकांसोबत मिसळून फवारणी करता येते.

# सिल्वा




Ortho Silicic Acid (OSA) **2.0% WSL** Ortho Silicic Acid (OSA) **18.0% WSL**

**प्रमाण :**

**फवारणीसाठी :** 1 ते 2 मिली / लिटर
**जमिनीतून : ड्रिप / ड्रेंचिंगद्वारे :** 500 मिली ते 1 लिटर / एकर

**उपलब्ध पॅकिंग :** 250, 500 मिली, 1 लिटर

**सक्रिय घटक :**

- ऑर्थोसिलीसिक ॲसिड 2% आणि ऑर्थोसिलीसिक ॲसिड 18%

**सिल्वा** हे ऑर्थोसिलीसिक ॲसिड वर आधारित उच्च दर्जाचे उत्पादन आहे. सिल्वाचा वापर केल्याने जैविक व अजैविक ताणापासून संरक्षण होण्यास मदत करते.

**फायदे :**

- पानांचा आकार, रुंदी तसेच जाडी वाढविण्यास मदत करते.
- पानातील हरितद्रव्याचे प्रमाण वाढून प्रकाशसंश्लेषण प्रक्रिया सुधारते.
- पानांची आवरण कडक झाल्यामुळे रसशोषक किडीपासून पिकांचे संरक्षण होते.
- पिकांची नैसर्गिक रोगप्रतिकारशक्ती वाढवून पिकाचे विविध रोगांपासून संरक्षण करते.
- सिल्वा हे अजैविक ताणाविरुद्ध पिकाला नैसर्गिक 'कवच' प्रदान करते.
- जमिनीतील क्षारांमुळे होणारा ताण कमी करण्यास मदत करते.
- अति उन्हात जवळपास 35 ते 40 से. पेक्षा जास्त तापमानात देखील पिकावरील ताण कमी करण्यास मदत करते.
- फुलांमधील परागकणांची गुणवत्ता सुधारते, ज्यामुळे फळधारणा जास्त होते.
- कीटकनाशके आणि बुरशीनाशकांवरील खर्च कमी करण्यास तसेच त्यांची कार्यक्षमता वाढविण्यास मदत करते.

## मायक्रोमिक्स डीएफ




**प्रमाण :**
**जमिनीतून : ड्रिप / ड्रेंचिंगद्वारे :** 5 लिटर / एकर

**उपलब्ध पॅकिंग :** 5 लिटर

### सक्रिय घटक :

- झिंक 3%, फेरस 2.5%, मॅंग्निज 1%, कॉपर 1%, बोरॉन 0.5%, मॉलीब्डेनम 0.1%

**मायक्रोमिक्स डीएफ** हे एमएस ग्रेड 2 म्हणजेच झिंक, फेरस, मॅंग्निज, कॉपर, बोरॉन आणि मॉलीब्डेनम या सूक्ष्मअन्नद्रव्यांवर आधारित उच्च दर्जाचे उत्पादन आहे.

### फायदे :

- पानांमधील हरितद्रव्याचे प्रमाण वाढून पिके अधिक हिरवीगार राहतात.
- पिकांची कायिक वाढ जोमदार होते आणि पांढऱ्या मुळांचा वेगाने विकास होतो.
- पिकातील फुलधारणा वाढून फूलगळ तसेच फळगळ कमी होते.
- पिकांची नैसर्गिक रोगप्रतिकारक शक्ती वाढून पिके रोगांना बळी पडत नाहीत.
- पिकांमध्ये संप्रेरकांची निर्मिती होऊन संतुलित आणि जोमदार वाढीस चालना मिळते.
- पिकाची फुलधारणा आणि फळधारणेत भरघोस वाढ होते.
- कळ्या, फुले आणि छोटी फळे गळून पडण्याचे प्रमाण प्रभावीपणे थांबते.
- रोग, कीड आणि बुरशी यांच्याविरुद्ध पिकाची नैसर्गिक प्रतिकारशक्ती वाढते.
- फळांमध्ये गर वाढून फळांचे वजन आणि आकारमान वाढण्यास मदत होते.
- फळांचा आकर्षक रंग, गोडी आणि चव सुधारून बाजारात उच्च दर्जा मिळतो.
- फळे तडकण्याचे (फुटण्याचे) प्रमाण कमी होऊन फळांची साठवणूक क्षमता वाढते.

## मायक्रोमिक्स ग्रीन




**प्रमाण :**

**फळपिके :** 10 किलो मायकोमिक्स ग्रीनचे द्रावण 7 दिवसाच्या अंतराने प्रति एकर वापरावे.
**भाजीपाला पिकास :** 10 किलो मायक्रोमिक्स ग्रीनचे द्रावण 5 दिवसाच्या अंतराने प्रति एकर वापरावे.

**उपलब्ध पॅकिंग : 2.5, 10 किलो**

### सक्रिय घटक :

- एमएस ग्रेड 1 (फेरस 2%, मॅंग्निज 1%, झिंक 5%, कॉपर 0.5%, बोरॉन 1%)

**मायक्रोमिक्स ग्रीन** हे फेरस, मॅंग्निज, झिंक, कॉपर, बोरॉन सूक्ष्मअन्नद्रव्यांवर आधारित उच्च दर्जाचे उत्पादन आहे.

### फायदे :

- पांढऱ्या मुळांची निरोगी वाढ होण्यास मदत मिळते.
- पानांमधील हरितद्रव्य वाढते त्यामुळे पिकाची प्रकाशसंश्लेषण प्रक्रिया वाढते.
- पिकांवरील शिरांमधील पिवळेपणा नाहीसा होऊन पाने टवटवीत होतात.
- पिकांमध्ये ऑक्सिन (Auxin) या संप्रेरकाची निर्मिती होऊन पिकाची संतुलित वाढ होते.
- पिकाची फुलधारणा तसेच फळधारणा वाढविते,
- कळ्या, फुले आणि छोटी फळे गळून पडण्याचे प्रमाण लक्षणीयरीत्या कमी होते.
- पिकाची रोग व कीड या विरुद्ध प्रतिकारशक्ती वाढविते.
- दुष्काळ, अचानक बदलणारे हवामान, जास्त थंडी किंवा उष्णता यांसारख्या प्रतिकूल
- परिस्थितीविरुद्ध पिकाची प्रतिकारशक्ती वाढविते.
- फळांमध्ये गर वाढून फळांचे वजन वाढीसाठी मदत करते.
- फळांचा आकार, रंग व चव उत्तम होण्यासाठी मदत करते.
- फळे तडकण्याचे प्रमाण कमी होते त्यामुळे फळांची टिकवण क्षमता वाढते.

## निमॅटोड्रॉप




**प्रमाण :**
**जमिनीतून : ड्रिप / ड्रेंचिंगद्वारे :** 1 लिटर / एकर

**उपलब्ध पॅकिंग :** 500 मिली, 1 लिटर

**सक्रिय घटक :**

- विविध सूक्ष्मजीव

**निमॅटोड्रॉप** हे विविध सूक्ष्मजीवांवर आधारित जैविक सूत्रकृमी नाशक. या उत्पादनांमध्ये विविध प्रकारचे फायदेशीर सूक्ष्मजीव बुरशी आणि जिवाणू यांचे मिश्रण आहे जे हानिकारक सूत्रकृमींचा नैसर्गिकरित्या नाश करण्यासाठी फायदेशीर आहे.

**फायदे :**

- सूत्रकृमीची अंडी, जुवेनाईल आणि प्रौढ या सर्व अवस्था नियंत्रणास मदत करते.
- पिकाच्या मुळांवरील गाठीचे प्रमाण कमी होऊन मुळांची वाढ आणि जाळे उत्तम प्रकारे पसरते.
- सूत्रकृमींच्या अंड्यांचा नाश करतात, ज्यामुळे त्यांची पुढील पिढी थांबते.
- इतर बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव देखील कमी करण्यास मदत करते.
- जमिनीतील स्थिर झालेले अन्नद्रव्ये पिकांना उपलब्ध करून देतात

## स्पेक्ट्रम एम 45




**प्रमाण :**
**फवारणीसाठी :** 2 ते 2.5 ग्रॅम / लिटर

**उपलब्ध पॅकिंग :** 500 ग्रॅम , 1 किलो

**सक्रिय घटक :**

- मॅंकोझेब 75% डब्ल्यूपी

**स्पेक्ट्रम एम 45** हे मॅंकोझेब या घटकावर आधारित संपर्कजन्य बुरशीनाशक आहे.

**फायदे :**

- एकाच वेळी करपा (Blight), तांबेरा (Rust), डाउनी मिल्ड्यू आणि पानावरील ठिपके यांसारख्या अनेक बुरशीजन्य रोगांवर नियंत्रण मिळण्यास मदत करते.
- पिकावर एक संरक्षणात्मक कवच तयार करते. रोगाचा प्रादुर्भाव होण्यापूर्वी याचा वापर केल्यास बुरशी झाडामध्ये शिरूच शकत नाही.
- पानांवर व्यवस्थित पसरते आणि बराच काळ टिकून राहते, ज्यामुळे पिकाला दीर्घकाळ संरक्षण मिळते.
- बुरशीनाशके, कीटकनाशक आणि इतर अन्नद्रव्यांसोबत मिसळून वापरता येते.

# नॅनो खते

**फायदे :**

- या खतांच्या कणांचा आकार 1 ते 100 नॅनोमीटर इतका असतो, ज्यामुळे ते वनस्पतीच्या पेशींमध्ये सहज प्रवेश करतात.
- कणांचा आकार लहान असल्याने त्यांचे पृष्ठभाग क्षेत्रफळ साध्या खतांच्या तुलनेत कितीतरी पटीने जास्त असते.
- नॅनो खते पाने तसेच पिकाच्या मुळांद्वारे त्वरित अवशोषित होतात.
- पारंपारिक खतांच्या तुलनेत नॅनो खते 80-90% पर्यंत कार्यक्षम असतात.
- ही खते पारंपारिक खतांच्या तुलनेत खूपच कमी प्रमाणात लागतात (उदा. एक गोणी रासायनिक खत = नॅनो खताची 500 मिली बाटली).
- ही खते बाष्पीभवन (Volatilization) किंवा पाण्यातून वाहून जात (Leaching) नाहीत.
- जमिनीचा सामू (pH) कमी-जास्त असला तरी नॅनो खतांच्या कार्यक्षमतेवर लवकर परिणाम होत नाही.
- पिकांना आवश्यकतेनुसार हळूहळू आणि दीर्घकाळासाठी पोषक द्रव्ये पुरवली जातात.
- जमिनीत क्षारांचे प्रमाण वाढत नसल्याने जमिनी नापीक होण्यापासून वाचतात.




18 46 00




00 52 34




00 00 50




00 60 20




05 55 17

# ग्लुको खते

**फायदे :**

- ग्लुकोनेटेड (ग्लुकोनिक ॲसिड) वर आधारित उत्पादने
- यामध्ये ग्लुकोनिक ॲसिडचा वापर चिलेटिंग एजंट म्हणून केला जातो त्यामुळे कोणतेही खत जमिनीत स्थिर होत नाही.
- इतर चिलेटेड (उदा. EDTA) खतांच्या तुलनेत ग्लुकोनेटेड खतांचा रेणू आकार लहान असतो.
- ग्लुकोनेटेड स्वरूपामुळे पिके ही खते अत्यंत वेगाने शोषून घेतात. साध्या सल्फेट खतांच्या तुलनेत याचे शोषण ५ ते १० पटीने जास्त असते.
- ही खते विद्युतभारीत नसल्यामुळे मातीतील इतर कणांना चिकटून न राहता थेट मुळांपर्यंत पोहोचतात.
- झाडाच्या रसवाहिन्यांतून (Phloem and Xylem) ही खते मुळाकडून शेंड्याकडे सहज प्रवाहित होतात.
- इतर रासायनिक खतांच्या तुलनेत यांचा क्षार निर्देशांक (Salt Index) अत्यंत कमी असतो.
- पूर्णपणे जैव-विघटनशील असून जमिनीत किंवा झाडामध्ये अवशेष राहत नाहीत.
- विविध सामू (pH) असलेल्या पाण्यामध्ये आणि जमिनीत ही खते स्थिर होत नाही.
- कमी तसेच जास्त तापमानात देखील पिकास त्वरित अपटेक होतात.
- ग्लुकोज वर आधारित खते असल्याने सूक्ष्मजीवांच्या वाढीसाठी खाद्य म्हणून काम करते.
- कोणत्याही प्रकारच्या जमिनीत स्थिर होत नाही, पिकास त्वरित उपलब्ध होतात.

**ग्लुको NPK मधील उपलब्ध खते :**

| | | | |
|---|---|---|---|
| ☑ 18 46 00 | ☑ 19 19 19 | ☑ 13 40 13 | ☑ 14 48 00 |
| ☑ 00 52 34 | ☑ 24 24 00 | ☑ 00 42 47 | ☑ 11 42 11 |
| ☑ 00 00 50 | ☑ 10 26 26 | ☑ 00 40 40 | ☑ 00 00 54 |
| ☑ 12 61 00 | ☑ 00 60 20 | ☑ 00 47 30 | ☑ 14 28 00 |
| ☑ 13 00 45 | ☑ 05 55 17 | ☑ 11 36 24 | ☑ 00 09 46 |





SPECTRUM AGROTECH
An ISO 9001-2008 Certified Company

Registered Office: 1202/20,21, Mumbai Agra Road,
Udyog Bhavan, Pimpalgaon, (Nashik), Tal. Niphad,
Maharashtra, Pin-422 209.
Email: spectrumagrotechpb@gmail.com
Customer Care: +91 7798539189 /+91 9960796078
**www.spectrumagrotech.com**